महात्मा फुले शिक्षण संस्थेचे,

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरूण-इस्लामपूर

## राज्यशास्त्र विभाग

### स्त्री-पुरुष समानता व भारतीय संविधान

### अहवाल (मंगळवार, १०  डिसेंबर, २०२५)

आज मंगळवार, दि. १० डिसेंबर, २०२५ रोजी राज्यशास्त्र विभागामध्ये '**स्त्री-पुरुष समानता व भारतीय संविधान**' या विषयावर डॉ. आश्विनी खाडे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. भारतीय संविधानाचे पूजन करून या कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक राज्यशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. अंगद पाटील यांनी केले. आपल्या प्रस्ताविकेमध्ये त्यांनी भारतीय संविधानामध्ये स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार करून कशा प्रकारे समानतेचा उद्घोष केला आहे हे स्पष्ट केले. तसेच सद्य परिस्थितीत या व्याख्यानाचे आयोजन करण्यामागील हेतू त्यांनी स्पष्ट केला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. एन. डी. पाटील विधी महाविद्यालयातील प्रा. सौ. अश्विनी खाडे उपस्थित होत्या. आपल्या संबोधनात त्यांनी भारतीय समाजव्यवस्थेत भारताचे संविधान अस्तित्वात येण्यापूर्वी आणि अस्तित्वात आल्यानंतरस्त्रियांच्या जीवनात कोणता मुलभूत फरक पडला आणि त्यामागील कारणांची मीमांसा केली. त्या म्हणाल्या, आधुनिक समाज निर्मितीमध्ये आणि विकासामध्ये  स्त्री आणि पुरुष दोघांनीही हातात हात घालून आपले योगदान दिल्याशिवाय समाजाचा सर्वांगीण विकास होणे अशक्य आहे. सध्या स्त्रियांच्या संदर्भात कोणते महत्वाचे कायदे आहेत आणि त्यातील महत्वाच्या तरतुदी त्यांनी स्पष्ट केल्या. त्याबरोबरच सध्या न्यायालयात सुरु असणाऱ्या अनेक खटल्यांचे दाखले देऊन त्यांनी समानता कशी गरजेची आहे हे स्पष्ट केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात राज्यशास्त्र  विभागप्रमुख प्रा. डॉ. संतोष खडसे म्हणाले की, आपल्या संविधानाने स्त्री-पुरुष समानतेच जो विचार आपणाला दिलेला आहे त्याचे पालन करणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे आणि त्याला अनुसरूनच आपण सर्वांनी व्यवहार केला पाहिजे. तरच आपल्या संविधानाचा उद्देश सफल होईल. या कार्यक्रमाचे आभार प्रा. डॉ. जावेद शेख यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हिंदी विभागाच्या प्रा. आश्विनी थोरात यांनी केले. या कार्यक्रमासाठी वाणिज्य विभागाचे प्रा. संदीप  पाटील उपस्थित होते.

HEAD
Department of Political Science
Karmaveer Bhaurao Patil College
Islampur, Tal. Walwa, Dist. Sangli (M.S.)

PRINCIPAL
Karmaveer Bhaurao Patil College
Urun-Islampur, Dist. Sangli. 415 409




‘स्त्री-पुरुष समानता आणि भारतीय संविधान’ या विषयावर मार्गदर्शन करताना प्रा. सौ. अश्विनी खाडे



अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना डॉ. संतोष खडसे